## सहशालेय उपक्रम

# १.संस्था वर्धापन दिन





शाळेची सुरुवात १५ जून पासून व त्याच महिन्यात संस्था वर्धापन दिन दरवर्षी येतो. या दिवशी संस्थेचे संस्थापक ब्रह्मीभूत गंगाधर वासुदेव चैतन्य महाराज यांच्या प्रतिमेस पूजन करून अभिवादन करण्यात येते. हाच तो दिवस की ज्या दिवशी एक छोटस रोपटे श्री मळाईदेवी शिक्षण संस्था या नावाने लावण्यात आले त्याचे आज मोठ्या वटवृक्षांमध्ये रूपांतर झाले आहे व आज वटवृक्षाच्या सावलीत शिक्षण घेणारे विद्यार्थी ,विद्यार्थिनी वेगवेगळया क्षेत्रात भरारी घेत आहेत.

या दिवशी संस्थेची स्थापना का व कशासाठी करण्यात आली यासंबंधी विद्यार्थ्यांना प्रबोधन करण्यात येते. याच दिवशी श्री मळाईदेवी दिनदर्शिकेचे प्रकाशन विद्यार्थिनींच्या उपस्थितीत केले जाते .

## २. शाळा प्रवेशोत्सव



दरवर्षी नवीन शैक्षणिक वर्षाची पहाट १५ जून रोजी उजाडत आमच्या विद्यालयांमध्ये अत्यंत उत्साहाच्या वातावरणात इयत्ता पाचवी ते दहावी सेमी व इंग्रजी माध्यमांच्या नवीन प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनी व माजी विद्यार्थिनी यांचे मोठे वाजत गाजत विद्यालयात स्वागत केले जाते.

शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांना शैक्षणिक अभ्यासक्रमाची पुस्तके, गणवेश व खाऊ देऊन शैक्षणिक दिवसाची चांगली सुरुवात केली जाते विद्यार्थिनींनी तितक्याच आतुरतेने शाळा माउलीचे दर्शन घेतात व शाळा माऊली परिसरात आपला पहिला दिवस अविस्मरणीय कसा राहील होईल यासाठी प्रयत्न करतात.

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थिनींना क्रमिक अभ्यासक्रम न शिकविता त्यांना खेळ, नृत्य किंवा इतर क्रीडा प्रकारांचे ज्ञान देऊन व संगणक प्रयोगशाळेतील उपकरणांची ओळख व वापर या माध्यमातून त्यांना पहिला दिवस त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी दिला जातो.



## ३. वृक्षारोपण व बीजरोपण  कार्यक्रम






श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेचा एक नाविन्यपूर्ण महत्त्वाकांक्षी उपक्रम म्हणजे डोंगर परिसरातील वृक्षारोपण व बीजरोपण  कार्यक्रम राबवून डोंगर परिसर हिरवागार  करून  पर्यावरणाचा समतोल टिकवण्याचा प्रयत्न करणे व सामाजिक भान जपणे.

मुलांना शालेय जीवनातच पर्यावरण सुरक्षेचा संदेश देऊन पर्यावरणाचे रक्षणाचा हा  उपक्रम संस्थेच्या सर्व शाखात राबवला जातो.आमच्या विद्यालयाच्या वतीने राबविल्या गेलेल्या या  उपक्रमाची M.K.N या TATA SKY वरील न्युज चॅनलने व  काही लोकल न्यूज चॅनलने सुद्धा दखल घेतली आहे.

आमच्या विद्यार्थिनींनी आजअखेर वृक्षारोपण करण्याबरोबर उन्हाळयात पशुपक्षी यांना खाऊ,निवारा याची व्यवस्था करीत असतात. संस्था सचिव शेतीमित्र अशोकराव  थोरात भाऊ यांचे मार्गदर्शनानुसार  संस्थेच्या  सर्व शाखा हा उपक्रम राबवित असून  सदर उपक्रम पथदर्शी उपक्रम म्हणून ओळखला जाईल अशी आम्हाला अशा आहे .

## ४. पाककला व पष्परचना स्पर्धा



पाककला व पुष्परचना स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना शालेय अभ्यासाबरोबर त्यांच्यातील सुप्त गुणांचा विकास करण्यासाठी व भविष्यात त्यांच्यातील व्यावसायिक जागृत करण्यासाठी आमच्या विद्यालयात या उपक्रमाचे आयोजन केले जाते.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थिनी शासहभागी होऊन स्वतः तयार केलेल्या पाककृती तसेच परिसरातील झाडांच्या पानांपासून, फुले वेली यापासून तयार केलेली पुष्पगुच्छ या प्रदर्शनात मांडतात सदर प्रदर्शनासाठी परीक्षकांच्या माध्यमातून त्यांच्या कलाकृतीला बक्षीस देऊन सन्मानित केले जाते या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण करून येणाऱ्या काळात आपल्यातील कलागुणांना त्यांनी जोपासावे व जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पहावे याकरिता हा उपक्रम राबविला जातो.



## ५. शारदेचा उत्सव म्हणजे शारदोत्सव व fashion Show







विद्येची देवता म्हणजे शारदा व शारदेचा उत्सव म्हणजे शारदोत्सव यावेळी कन्याशाळेच्या विद्यार्थिनींच्या उत्साहाला पारावर नसतो आणि या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थिनी मधील कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला जातो या दिवशी विद्यार्थिनी गायन,नृत्य, वादन इत्यादी सर्व कलागुणांचा अविष्कार व त्याचे सादरीकरण करतात.

मुलींच्या वर सामाजिक बंधने जास्त असतात त्यामुळे मुलींना सहजपणे वावरता येत नाही अशा वेळेस विद्यालय स्तरावर फॅशन शोचे आयोजन करून विद्यार्थिनींना पारंपारिक वेशभूषा परिधान करून येण्यास सांगितले जाते व त्याचे सादरीकरण केले जाते. विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी या क्षेत्रामध्ये काम करतात त्यांना बोलावून त्यांच्यामार्फत परीक्षण केले जाते.

## ६. १९ फेब्रुवारी – शिवजयंती



सर्व राष्ट्रीय नेते,समाजसुधारक यांची जयंती पुण्यतिथी उत्साहात साजरी करणे व त्यातून आपल्या देशाच्या उभारणीत व जडणघडणीत ज्यांनी आपले प्राण पणाला लावले त्यांचे स्मरून करून त्याच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस. तेवढ्याच उत्साहात आणखीन एक जन्मदिन साजरा केला जातो तो म्हणजे आपले आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अर्थात जन्मदिवस.

या दिवशी इयत्ता सातवी ब मधील विद्यार्थिनी नाटिका, पोवाडा ,पोशाख व अभिनयाद्वारे छत्रपतींचा इतिहास सर्वांसमोर मांडण्याचा प्रयत्न करतात. इतिहास शिक्षक श्री. योगेश खराडे यासाठी विशेष परिश्रम घेतात. तसेच सर्व शिक्षकांचे शिक्षिका यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळत असते सदर दिवशी ऐतिहासिक नाटकांमध्ये भाग घेतलेले सर्व विद्यार्थी ऐतिहासिक पोषक प्रदान करून येतात त्यामुळे विद्यालय परिसर इतिहासमय होऊन जातो.छत्रपतींचे आठवावे रूप,छत्रपतींचा आठवावा प्रताप असे म्हणत छत्रपतींचा सर्वत्र जयघोष केला जातो.यातून राजा कसा असावा,आदर्श राज्यकर्ता कसा असतो याचे ज्ञान विद्यार्थिनीना होते.

.



# ७.कै.पांडुरंग पुजारी शैक्षणिक साहित्य निर्मिती प्रदर्शन



संस्थेचे हितचिंतक कै.पांडुरंग पुजारी यांच्या स्मृतिदिनानिमित्त शैक्षणिक साहित्य निर्मिती प्रदर्शनाद्वारे विद्यार्थिनी मधील सृजनशीलतेला वाव देण्याचा प्रयत्न केला जातो. यामध्ये इयत्ता पाचवी ते दहावी मधील विद्यार्थीनी स्वत:ची उपकरणे व शैक्षणिक साहित्य स्वत: तयार करून आणतात.

प्रत्येक वर्गामध्ये त्याची मांडणी करून इयत्ता पाचवी ते सातवी लहान गट व नवीन आठवी नववी दहावी मोठा गट अशा स्वरूपातील स्पर्धा आयोजित केली जाते व या शैक्षणिक साहित्य मदत मधील उत्कृष्ट साहित्याला बक्षीस व प्रशस्तीपत्रक देवून सन्मानित करण्यात येते.शालेय स्तरावरील या स्पर्धेमधून भविष्यातील एक सायंटिस्ट निर्माण व्हावेत यासाठी हा उपक्रम आयोजित केला जातो .



## ८.वर्ग सुशोभन व स्वयं शासन दिन



स्वयंशासन दिन या दिवशी इयत्ता 10 वी मधील विद्यार्थिनी शिक्षकांच्या भूमिकेत जाऊन त्या दिवशी सर्व शाळांचे कामकाज पाहतात त्या द्वारे त्यांना शालेय शिस्त ,शालेय कामकाजाचा अनुभव इत्यादी गोष्टींची माहिती मिळते. स्वयंशासन दिनाचा उद्देश त्यामुळे सफल होतो.

तसेच वर्गसुशोभनाद्वारे इयत्ता पाचवी ते दहावीतील सर्व विद्यार्थिनी आपापल्या वर्गामध्ये फळे व आपला वर्ग कसा सुंदर दिसेल यासाठी तक्ते किंवा इतर टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करून वर्गात त्याची योग्य मांडणी करतात. त्यातून विद्यार्थिनीना सामुहिक नेतृत्वातून चांगले काम उभे राहू शकते याची जाण निर्माण होते. याच दिवशी सर्व वर्गात स्पर्धा लावून त्यांना कष्ट घेण्याची सवय व विजयाचे व कामाचे समाधान त्यातून प्राप्त केले जाते .विजेत्या सर्व वर्गांना बक्षीस म्हणून प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येते.



## ९. श्रमदान व स्वच्छता शिबिर



२ ऑक्टोंबर राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती दिनाचे औचित्य साधून दरवर्षी आमच्या विद्यालयात शाळा, शाळा परिसर,नांदलापूर, जखिणवाडी व मलकापूर परिसरात स्वच्छता मोहीम राबवली जाते. या उपक्रमांतर्गत खेड्यांकडे चला, खेडी सुधारल्याशिवाय देश सुधारणार नाही या गांधीजींच्या संकल्पनेनुसार हा दिवस स्वच्छता अभियान राबवून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ जयंत पुण्यतिथी साजरी करून उपयोगाची नाही तर त्या दिवसाचे महत्त्व समजून घेऊन राष्ट्रपुरुषांनी जे काही सामाजिक कार्य केले त्याचे आपण पाईक होऊन ते कार्य अविरतपणे चालू ठेवले पाहिजे या हेतूने दरवर्षी हा उपक्रम साजरा केला जातो.

मलकापूर जिमखाना असोसिएशन व मलकापूर रोटरी क्लब यांनीही आमच्या उपक्रमाला हातभार लावून विद्यार्थिनींना शालेय जीवनातील स्वच्छतेचे व श्रम संस्काराचे महत्त्व समजावून दिले.

